**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २७.०७.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची एनडीपीएस व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २६.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून ६,५५,५४०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करुन ३,४००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,००९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९२,५५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २६.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २७.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०९ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— वायर चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक १६.०७.२०२६ चे ११.०० वा. ते १३.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. १५, उसकेलवार ले आऊट, जुने पोलीस स्टेशन रोड, हुडकेश्वर, नागपुर येथे फिर्यादी विपीन आबाजी आत्राम वय ३५ वर्षे यांचे नविन घराचे बांधकाम सुरु असून, एका रुममध्ये इलेक्ट्रीक फिटींगचे साहित्य व पॉलीकॅब कंपनीचे वेगवेगळया एमएमचे वायर बंडल कि. ८०,०००/— रु. चा मुद्येमाल रुममध्ये ठेऊन लॉक करुन ठेवला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे रुमचे लॉक तोडुन, आंत प्रवेश करून, नमुद मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(२), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, सापळा रचून गुन्ह्यातील आरोपी यास ज्युपिटर गाडी क्र. एमएच ३१ जीसी ५१८६ सह ताब्यात घेतले. त्यास नाव पत्ता विचाला असता, त्याने त्याचे नाव पंकज श्रावणजी खाकरे वय ३३ वर्ष रा. प्लॉट क्र. १०५, हुडकेश्वर रोड, धामणा, नागपूर असे सांगितले. त्यास विचारपूस केली असता, त्याने वर नमुद वायरचोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयातील मुद्येमाल २२ वायर बंडल कि. ८०,०००/—रू. चे तसेच ज्युपिटर गाडी असा एकूण १,७०,०००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त(डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथक यांनी केली.



**<u>३) सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— लॅपटॉप चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १३.०७.२०२६ चे २०.१५ वा. ते दिनांक १४.०७.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, प्लॉट नं. ९९, व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर येथे फ्रॅंकफिन इंस्टीटयुट ऑफ एअर होस्टेस ट्रेनिंग येथे फिर्यादी प्रशांत मधुकरराव नाखले वय ५० वर्षे रा. जयताळा रोड, प्रतापनगर, नागपूर हे सहायक व्यवस्थापक म्हणून काम करतात. त्यांचे कार्यालयातील क्लर्क यांनी कामकाज करुन एचपी कंपनीचा लॅपटॉप केबिनचे टेबलवर ठेऊन घरी गेले असता, कोणीतरी चोरुन नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिताबर्डी पोलीसांनी गुन्हा दाखल करून सीसीटिव्ही चेक केले असता, घटनास्थळी सेक्युरिटी गार्डचे काम करणारा इसम नामे सचिन सुरेशराव रावणकर वय ३३ वर्ष रा. चिखल सावंगी, ता. मोर्शि जि. अमरावती ह.मु. कर्नलबाग, गणेशपेठ, नागपूर याने चोरी केल्याचे दिसून आले. सिताबर्डी पोलीसांनी आरोपीचा शोध घेऊन त्याचे ताब्यातुन गुन्हयातील लॅपटॉप कि. १५,०००/— रु. चा हस्तगत केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. सुहास राऊत, दुपोनि. मनिष कोल्हटकर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि विनोद तिवारी, पोहवा. विनोद तसलीकर, पोअं. राहुल भोपळे, सुशांत वाडीया व विक्रम यांनी केली.



**<u>४) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— मकोकाचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अग्निशस्त्रासह अटक.</u>**

पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, गैरकायद्याची मंडळी जमवून खुनाचा प्रयत्न व मकोकाचे गुन्हयातील पाहिजे आरोपी शानु उर्फ गोलु मनोज वैद्य हा घटना घडलेपासून मिळून येत नव्हता. त्याचे शोधार्थ तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, दिनांक २७.०७.२०२६ चे ०४.४५ वा. चे सुमारास, ऑटोमोटिव्ह चौक ते विटाभट्टी चौक रस्त्यावरील एजीस गॅस पंपाचे विरुध्द बाजुला, सापळा रचून एका पांढरे रंगाचे ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४० एक्स ८६५१ वरील इसमास ताब्यात घेतले. त्यास त्याचे

नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव शानु उर्फ गोलु मनोज वैद्य वय २४ वर्ष रा. बी–८/९०, एनआयटी क्वॉर्टर, आंनदनगर, यशोधरानगर, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचेजवळ एक गावठी बनावटीचे पिस्टल व मोबाईल मिळून आला. त्याचे जवळील ॲक्टिव्हाचे डिक्कीची पाहणी केली असता, त्यामध्ये एक स्टीलचा धारदार चाकु मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन एक पिस्टल मॅगझीनसह, एक चाकु व वाहन असा एकूण किंमती १,००,४००/– रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्निशस्त्र व चाकु बाळगुन मिळुन आला. तसेच त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केले. आरोपीस पोलीस ठाणे यशोधरानगर येथे दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुस शेख, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंद्रे, पोअं. संदीप वानखेडे, भुषण येरोजवार, मनिष झरकर, क्षितेश चौरसिया, आशिष पिपरहेटे व प्रविण युवनाते यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे बेलतरोडी :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०७.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, लुपिन प्रायव्हेट लिमीटेड, खापरी मिहान येथे काम करणारे कंपनीचे कर्मचारी नामे पंकज गजानन भोळे वय ४६ वर्ष रा. करनारी ता. भुसावळ जि. जळगाव ह.मु. मनिषनगर, नागपूर हे त्यांची डयुटी संपवून पॅशन प्रो दुचाकी क्र. एमएच ३५ एएन २५१९ ने कंपनीतुन घरी जात असता, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत भारत पेट्रोल पंपसमोरील डिव्हायडर, कटींग क्रॉस येथे वर्धेकडून येणाऱ्या टाटा विंगर चारचाकी क्र. एमएच ४० सीटी ४३५७ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पकंज यांचे मोटरसायकलला मागुन धडक देवुन गंभीर जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता एम्स रूग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी कंपनीचे सेक्युरिटी गार्ड फिर्यादी दिनेश अर्जुन वानखेडे वय ४३ वर्षे, रा. गुमगाव, हिंगणा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१) भा. न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** दिनांक २६.०७.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, मेडीकल हॉस्पिटल, पेईंग वार्डचे बाजुला असलेल्या वेटींग हॉलमध्ये एक अनोळखी महिला वय अंदाजे ५० वर्षे वयाच्या, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, वार्ड क्र. ४७ येथे दाखल केले होते., उपचारादरम्यान ०९.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे मपोउपनि. पुष्पांजली जांभळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गणेशपेठ:—** दिनांक २७.०७.२०२६ चे ०७.०७ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, घाट रोड, श्री सिमेंट प्रॉडक्ट दुकानासमोरील हनुमान मंदीराचे भिंतीलगत फुटपाथवर एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. वर्णन— रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची — ५ फुट ४ इंच, डोक्याचे केस—काळे पांढरे व वाढलेले, दाढी मिशी —वाढलेली, अंगात—डिएमआर कंपनीची ब्राऊन रंगाची अंडरविअर घातलेली आहे. उजवे हातावर अमोल नाव गोंदलेले असून हाताला भगवा धागा बांधलेला आहे. वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. सागर भोकरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**